# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

## P.R.O Office, Palghar

**Phone No. 02525-297032, Mob No.8669604078**
**Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)**
**E-mail : propalghar@gmail.com**


**Date: 03/02/2018**

# प्रेसनोट

**केळवा मधुकरनगर येथे जेष्ठ नागरीकास लुटणा-या अनोळखी आरोपींना जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखा,पालघर यांना यश,**

पालघर जिल्हयातील केळवा सागरी पोलीस ठाणे हद्दीतील मु.चटाळे,कवळीवाडी येथे राहणारे फिर्यादी वय ६२ हे दि.१५/९/२०१७ रोजी सायंकाळी १७.१५ वा.चे सुमारास मधुकरनगर येथील रोडने पायी चालत जात असताना एका पांढ-या रंगाचे नंबर प्लेटवर नंबर नसलेल्या ॲक्टीवा मोटार सायकल वरुन दोन इसम आले व त्यांनी एडवण कडे जाण्याचा रस्ता विचारुन त्यांचे गळयातील सोन्याची चैन व हातातील मोबाईल हॅन्डसेट असा एकुण ३५,८००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरी चोरी करुन चोरुन पळून गेल्याने नमुद दोन अनोळखी आरोपी विरुध्द दिलेल्या फिर्यादीवरुन **केळवा पोलीस ठाणे** गुन्हा रजि.क्र.। २८/२०१७ भादंविसंक.३९२,३४ प्रमाणे दि.१५/९/२०१७ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयातील दोन अनोळखी आरोपींचा व त्यांचे ताब्यातील नंबर नसलेल्या ॲक्टीवा मोटार सायकलचा पोलीस अधीक्षक,पालघर मा.श्री मंजुनाथ सिंगे, उप विभागीय पोलीस अधिकारी,पालघर मा.श्री.निमीत गोयल यांचे मार्गदर्शनाखाली शोध घेत असताना दि.०१/०२/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.के.एस.हेगाजे यांना खब-यांकडून मिळालेल्या माहितीवरुन १) सपोनि/एम. चाळके, २)सहा.फौज.बी.पाटील, ३) पोना/एस. सुर्यवंशी ४) पोना/एस.मर्दे, ५) पोना/एन.पाटील, ६) पोशि/एन.जनाठे, यांचे पथक तयार करुन सफाळे बाजार पेठेतून आरोपि क्र.१ व २ यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडे सदर गुन्हयाबाबत सखोल चौकशी करता, त्यांनी दि.१५/९/२०१७ रोजी १७.१५ वा.चे सुमारास मधुकर नगर केळवा या ठिकाणी एका जेष्ठ नागरीकाला लुटल्याचे कबुल केल्याने, त्यांचे ताब्यातुन एकुण ३५,८००/- रुपये किंमतीचा मुददेमाल व गुन्हा करण्यासाठी वापरलेली ॲक्टीवा मोटार सायकल हस्तगत करुन पुढील कार्यवाही करीता प्रभारी अधिकारी, केळवा सागरी पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले असून नमुद आरोपींना मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पालघर कोर्टात हजर केले असता त्यांची दि.५/२/२०१८ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर असून सदर गुन्हयातील अटक आरोपींनी अशा प्रकारने अन्य गुन्हे केले असल्याची शक्यता असून गुन्हयाचा अधिक तपास प्रभारी अधिकारी केळवा सागरी पोलीस ठाणे श्रीमती सिध्दवा जायभाये या करीत आहेत.